# डॉ. आंबेडकर : दलित साहित्याचा प्रेरणास्रोत

**डॉ. महावीर विठ्ठल कांबळे,** मराठी विभाग प्रमुख, कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु. || ता. कराड, जि. सातारा.

---

**प्रास्ताविक :**

स्वातंत्र्यानंतर भारतात बदलत्या परिस्थितीनुसार साहित्यातही परिवर्तन होऊ लागले. स्थित्यंतरे होऊ लागली. या स्थित्यंतरातून तळागाळातील समाज-परिवर्तनाचे ठसठसित चित्र साहित्यात दिसू लागले. दलितांच्या जगण्याशी निगडीत असणारे प्रश्न दलित साहित्यात प्रामुख्याने आलेले आहेत. समाज परिवर्तन, प्रबोधन आणि सामाजिक बांधिलकेच्या विचाराने दलित साहित्य हे स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्यायावर आधारित समाज व्यवस्था तयार करण्यासाठी निर्माण झाले आहे.

काळोखाच्या गर्भातील दलित समूहाला साहित्यात आणून त्यांच्या व्यथा-वेदनांना दिग्दर्शित करून अन्यायी गोष्टीनां नाकारत नवमानव्याच्या प्रतिष्ठापणेसाठी, नवसमाज निर्मितीसाठी दलित साहित्य आणि चळवळ बांधिलकी सांगणारे आहे. अशा या दलित साहित्याचा व त्याच्या बदलत्या प्रवासाचा आपण विचार करणार आहोत. या मध्ये प्रामुख्याने I) दलित संकल्पनेचा उदय , त्याच्या स्वरूपाचा विचार करवयाचा आहे. आणि शेवटी दलित साहित्याची बोधी साहित्याकडे होणारी सकारात्मक वाटचालीचा थोडक्यात आढावा घेऊन निष्कर्ष नोंदवावयाचे आहेत.

**उद्देश :-**

1. दलित संकल्पनेचा उदय स्पष्ट करणे.
2. दलित साहित्य प्रवाहाचे महत्त्व विशद करणे.
3. 'साहित्याचा केंद्रबिंदू हा माणूस असतो' या विधानाशी दलित साहित्य कसे सुसंगत आहे हे स्पष्ट करणे.
4. दलित साहित्य या अग्रसंज्ञेपासून ते बोधी साहित्य हा संज्ञात्मक बदलांचा प्रवास स्पष्ट करणे.

**दलित संकल्पनेचा उदय :-**

२१ मार्च, १९२० या दिवशी माणगांव परिषदेच्या निमित्ताने छ. शाहू महाराजांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सार्वजनिक जीवनाची सुरवात करून मानव मुक्तीचा लढा उभारला. या लढ्यानेच आंबेडकरी तत्त्वज्ञानाला जन्म दिला. यांतून मानवमुक्तीचा जाहिरनामा सादर केला गेला. हा जाहिरनामा आत्मसात करून दलित साहित्यिकांनी आपल्या साहित्यनिर्मितीस दमदारपणे सुरवात केली. दालत कविता आणि आत्मकथने याची उत्तम उदाहरणे म्हणून सांगता येतील. आज या साहित्याने आपली ओळख निश्चित केली आहे. या साहित्याची निर्मिती ज्या संकल्पनेवर आधारलेली आहे ती संकल्पना पहिल्यांदा समजावून घेणे गरजेचे आहे. या संदर्भात डॉ. कृष्णा किरवले म्हणतात, "दलित संकल्पनेचा प्रारंभ अथवा प्रथम स्विकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वृत्तपत्रीय लेखनातून झालेला असून डॉ. आंबेडकरांच्या वृत्तपत्रात हा शब्द उपयोजिल्याने 'दलित साहित्य संकल्पना' त्यातून उदयास आलेली दिसून येते." या वरून 'दलित' या शब्दाचा उपयोग डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या वृत्तपत्रीय लेखनांतून केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे 'दलित साहित्य' ही संकल्पना डॉ. आंबेडकरांच्या शब्द वापरातून आकारास आली असल्याने 'दलित' या शब्दाचे सामर्थ्य आणि महत्त्व आपल लक्षात येते. अर्थात् आपण हे जाणतोच की 'दलित संकल्पना भारतामध्ये परंपरेने आलेली आहे. जुन्या परंपरेतील वेद पुराण, स्मृतिग्रंथामधून दालत वर्गाला शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या गुलाम करण्यासाठी ब्राह्मणी तत्त्वज्ञानाची ब्राह्मणेत्तर बहुजन समाजात कार्यान्वित झालेली यंत्रणा दलितांच्या पिळवणुकी करीता निर्माण झाली असल्याचे लक्षात आले तेव्हा डॉ. आंबेडकरांनी अशा पारंपरिक विचारांना विरोध करून सकारात्मक विद्रोह प्रभावीपणे व्यक्त केला.

आजच्या काळात डॉ. आंबेडकर हे एका संस्कृतिचे नाव म्हणून पुढे आले. अर्थात या संस्कृतिला भ. बुद्धांच्या विचारांचा भक्कम पाया आहे. आज अडीच हजार वर्षानंतरही जे तत्त्वज्ञान दलित साहित्याला आणि चळवळीला प्रेरणादायी ठरले ते तत्त्वज्ञान मानवतावादी नि क्रांतीमूल तत्त्वज्ञान आहे. भ. बुद्धांचे मानवी मोठेपण त्यांच्या प्रत्येक दर्शनांतून सिद्ध होते. जगातल्या इतर धर्माच्या तुलनेत भ. बुद्धांचा धर्म हा कुणाही अतर्क्स-अज्ञाताचा किंवा अशाच अतर्क्स अज्ञात शक्तीने नियंत्रित केलेला नसून तो केवळ मानवीय-माणसासाठी होता. माणूस व माणसाचे मन हे त्या धर्माचे केंद्रस्थान होते. "बुद्ध हा भारतीय इतिहासात सर्वात मोठ्या समाज क्रांतीचा उद्गाता होता. जातिव्यवस्था ईश्वरनिर्मित नसून कृत्रीम असल्याचा तो उपदेश करीत असल्याने व भिक्षुसंघात वर्णजातिभेद नसल्याने तो खरा समाजसुधारक होता. भारतातील सर्वश्रेष्ठ दर्शन संप्रदायाचा तो प्रवर्तक होता. आणि बहुजनांना समजेल अशा पद्धतीने दर्शनाच्या जटिलतम् समस्यांचे विवरण करणारा अनन्यप्रचारक होता" बुदांच्या पुढे प्रश्न होता तो दुःख, कष्ट, क्लेश यांच्या निवारणांचा आणि सर्वार्थाने मानवी जीवन सुखकारक करण्याचा...! याच्या उत्तरासाठी त्यांनी शास्त्रशुद्ध, तर्कशुद्ध आणि बुद्धिप्रामाण्यवादी विचारांचा आधार घेतला. बहुजनांना आपले दर्शन- तत्वज्ञान समजण्यासाठी सर्वात अगोदर त्यांनी संस्कृत भाषेचा त्याग करून जनसामान्यांच्या त्या काळच्या 'पाली' भाषेतून आपले धम्म-तत्त्वाचे दर्शन दिले. ही भाषिकदृष्ट्या अत्यंत महत्वाची गोष्ट भ. बुध्दानी केली. या बरोबरच त्यांनी आपल्या धर्मामध्ये स्वतःला कोणत्याही प्रकारचे विशेष असे स्थान दिले नाही. इतकेच नव्हे तर आपले मत हे अंतिम मत आहे असा दावा देखिल कधी केला नाही. त्यांनी आपल्या धर्माला फक्त दुःखमुक्तीचा मार्ग म्हणून संबोधले आहे. या संदर्भात प्रा. गौतमीपुत्र कांबळे म्हणतात, "भारतात प्रबोधनाची आद्य सुरवात गौतम बुद्धांनी इ.स.पूर्व ६व्या शतकात सुरु केली आहे. आणि त्यानंतर १९व्या शतकात फुले-आंबेडकरांनी प्रबोधनाची दूसरी अर्वाचीन परंपरा सुरु केली" म्हणून डॉ. आंबेडकर

हे एका संस्कृतीचे नांव आहे. ही संस्कृती जगातील कोणाही मानवाने अंगीकृत करावी अशी वैश्विक स्वरूपाची असल्याने आंबेडकरी तत्त्वज्ञान हे दलित साहित्य संकल्पनेच्या प्रेरणा - स्थानी असलेले दिसून येते. अर्थात बुद्ध-फुले-आंबेडकरी विचार घेऊन 'दलित साहित्य संकल्पना' आकारास आलेली आहे.

दलित साहित्य हे स्वातंत्र्य, समता, न्यायाची मागणी करून सामाजिक परिवर्तन करू इच्छिणारे, विद्रोह, नकार, दुःख-क्षोभ, चीड संताप, प्रेम करुणा या मूल्यभावांनी युक्त वाङ्मय आहे. या उलट प्रस्थापित मराठी साहित्याचा प्रवाह शांत, स्थिर, स्थितीप्रिय असल्याने परिवर्तनाला तो सामोरा जाऊन कवटाळत नाही. सृजनाला सहाय्य करीत नाही. मराठी दलित साहित्य हे विज्ञाननिष्ठतेचा स्विकार करीत असल्यामुळे अज्ञान - अंधश्रध्देला ते भारा न देता त्याठिकाणी बुद्धिप्रामाण्यवादी आणि मानवतावादी दृष्टीकोन स्विकारते. म्हणून ते क्रांतिसन्मुख साहित्य आहे. ते सृजनशील आहे.

अशा प्रकारे नव्या मानवसंस्कृतीची प्रस्थापना करण्यासाठी विद्रोही उद्‌गार प्रसृत करणारे आणि सृजनात्मक क्रांतिदर्शी आविष्कार घडविणारे 'दलित साहित्य' हे सदैव माणसासाठी 'बहुजन हिताय सुखाय' ची प्रेरणा देणारे माणसाचे वाङ्मय आहे. मानवतेच्या मांगल्याची वाट पाहणारे आणि हे जग बदलणाऱ्या नवा मनाच्या निर्माणाची वाट पाहणारे, नवे मन सिद्ध होईल तेंव्हाच खऱ्या अर्थाने मानवतेचा साक्षात्कार होईल, तेंव्हाच नव्या मानव संस्कृतीचा पूर्ण उदय झालेला असेल.

**दलित साहित्य : नामांतर चर्चा -**

मुलतः दलित साहित्याची चर्चा करताना, १९६० नंतर उदयास आलेल्या अनेक साहित्य प्रवाहापैकी 'दलित साहित्य' हा प्रवाह अत्यंत कमी वेळेत मान्यताप्राप्त व स्थीर झाल्याचे आपल्या लक्षात येते. या दलित साहित्याचा 'दलित साहित्य' या संज्ञेविषयी म्हणजे नावाविषयी मधल्या काळात वेगवेगळया प्रकारची चर्चा झाल्याचे निदर्शनास येते. अर्थात ही चर्चा 'दलित साहित्य म्हणून हा प्रवाह आकारला येत होता त्यापासून होत होती. साहित्य कधी दलित असतं, हे ऊरबडवे आहे, इत्यादी... मात्र आत्मशोध आणि प्रसंगी आत्मटिका हे सुध्दा दलित साहित्याचे वैशिष्टये राहिले आहे. त्या अर्थाने दलित साहित्य या संज्ञेविषयी विविध मतमतांतरे असलेली दिसून येतात.

सर्व प्रथम प्रसिध्द लेखक, कवी व समीक्षक केशव मेश्राम यांनी महाबळेश्वर येथे झालेल्या विभागीय साहित्य संमेलनात दिनांक ०८ व ०९ नोव्हेंबर १९७० रोजी 'दलित साहित्य' हे एका जातीपुरते मर्यादित असल्याचे साहित्य होत आहे की काय असा सूर मांडला हे सांगताना लिहिणारा, वाचणारा असा दलित वर्गच जास्त आहे. त्यामुळे अस व्हायला नको इतर शोषित घटकांनासुध्दा याचा स्पर्श हवा हे सांगणार. तेवढ्यातच माध्यमांनी वेगळाच सूर लावला आणि चर्चेला उधाण आले. तसे केशव मेश्राम हे 'दलित साहित्य' या संज्ञेचेच वाहक आहेत. परंतु या नंतर अनेक अभ्यासक, लेखकांनी आपली वेगवेगळ्या प्रकारची भूमिका मांडण्यास सुरुवात केली. ज्यामध्ये यशवंत मनोहर आणि योगेंद्र मेश्राम यांनी 'आंबेडकरवादी साहित्य' अशी संज्ञा वापरली असा विचार प्रवास सुरु केला.

डॉ. शरद पाटील यांनी 'अब्राम्हणी साहित्य' असे नाव वापरले. गौतमीपूत्र कांबळे यांनी 'फुले आंबेडकरी' प्रेरणेचे साहित्य असे नाव वापरावे असे सांगितले. तर विजय सोनवणे यांनी बौध्द साहित्य असे नाव घ्यावे असा विचार मांडला. इत्यादी प्रकारे अनेक नामाभिदान घ्यावे असा सूर उमटत राहिला. मात्र फक्त संज्ञेचा विचार करणा-या या सर्व विचारवंतांना हे चांगले ज्ञात आहे की, दलित सहित्याच्या केंद्रस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकराची विचारधाराच आहे. जी विचारधारा भगवान बुध्दांच्या, महात्मा फुल्यांच्या विचारांशी थेटपणे भिडणारी आहे. बुध्दांचा लोकशाही विचार तसेच त्यांचा 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हा मुलमंत्र बाबासाहेबांनी आपल्या प्रत्येक आंदोलनाचा कृतीकार्यक्रम ठरवला होता. शिवाय कबिर, बुध्द, फुल्यांना बाबासाहेबांनी गुरु मानले आहे. त्यामुळे दलित साहित्य नावारुपाला येताना हे 'आंबेडकरी तत्वज्ञान' आपले अंगभूत वैशिष्ट्य म्हणून घेवून सर्वदूर पसरले आहे. शिवाय पहिल्या पिढीतील दलित विचारवंत डॉ. गंगाधर पानतावणे यांनी अविरतपणे चालविलेले चळवळीचे 'अस्मितादर्श' हे त्रैमासिक कि ज्या त्रैमासिकातचे घोषवाक्य होते की, 'आम्हाला मुखवटयाचे साहित्य नको, आम्हाला हवे आंबेडकरवादी साहित्य'

या सर्व बाबींचा तपशिलवार विचार केल्यास, 'आंबेडकरवादी विचारसरणी केंद्रवर्ती असणारे साहित्य म्हणून दलित साहित्याकडे पहावे लागते व हीच संज्ञा योग्य आहे असे म्हणावे लागते. ज्या साहित्याच्या केंद्रस्थानी 'माणूस आणि माणवता' आहे असे साहित्य म्हणजे दलित साहित्य. ज्या साहित्याने आंबेडकरी विचारधारा आत्मसात करुन बाबासहेबांचा साहित्याविषयक दृष्टीकोन आपल्या साहित्यातून अविष्कृत केला आहे असे साहित्य म्हणजे दलित साहित्य. समता, स्वतंत्र, बंधुता व सामाजिक न्याय यासोबतच विज्ञानवादी दृष्टीकोणाची प्रतिष्ठापना करणारे साहित्य हे दलित साहित्य..! वेदना, विद्रोह, नकार आणि मानवाला पोषक असणा-या मुल्यांचा स्विकार करणारे साहित्य म्हणजे दलित साहित्य..! सर्वहारा समाजाची व्यथा आणि वेदना मांडून त्यांच्याप्रती न्यायभूमिका स्विकारायला प्रवृत्त करणारे साहित्य म्हणजे दलित साहित्य..! अन्यायग्रस्त समाजाप्रती संवेदनशिलता जागृत ठेवून बौध्द विचार आणि आंबेडकरी तत्वज्ञानाची संविधान बैठक असणारे साहित्य म्हणजे दलित साहित्य होय.

**बोधी संस्कृती :-**

उपरोक्त दलित साहित्याच्या गतीमान अवस्थेचा विचार करता नाय्यक्षेत्रात अत्यंत प्रभावी रचना निर्माण केलेले लेखकीय व्यक्तीमत्त्व म्हणून प्रेमानंद गज्वी यांनी गेल्या अनेक वर्षापासून बोधी कला, बोधी संस्कृती, बोधी नाट्य इत्यादी नावाने आंबेडकरी तत्त्वज्ञान एक यशस्वी पध्दतीने मांडण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात.

'बोधी' या शब्दातच ज्ञान आहे. पण हे साधेसुधे ज्ञान नसून सम्यक ज्ञान आहे. दलित रंगभूमीचा एकविसाव्या शतकातील टप्पा म्हणजे 'बोधी रंगभूमी' हा होय. प्रेमानंद गुज्वी यांच्यासमवेत काही समकालिकांनी दिनांक २२ नोव्हेंबर २००३ रोजी बोधी नाट्य परिषदेची स्थापना केली. 'बोधी' ही संकल्पना दलित साहित्याच्या प्रवासातील वैचारिक विकासाचेच बदलते रुप अधोरेखित करणारी आहे. प्रेमानंद गज्वी या संबंधी बोलताना म्हणतात, "बोधी नाट्य परिषदेच्या स्थापनेत कलेच्या उत्कर्षासाठी काही ठोस करणं हे उद्दिष्ट होतं, आहे म्हणून बोधी नाट्य परिषदेअंतर्गत कार्य सुलभतेसाठी आम्ही उपविभागही सुरु केले आहेत. बोधी विचार सभा, साहित्य सभा, बोधी फिल्म सोसायटी, यातून सर्वंकष असं काही काम सिध्द करण्याचा प्रयत्न आहे."१० गज्वींची ही संकल्पना व्यापक स्वरुपाची आहे. त्यांच्या मते १९६० च्या दशकात दलित साहित्य लिहिणारी पहिली पिढी आणि १९८० च्या दशकातील आंबेडकरवादी दुसरी पिढी तर २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर लेखन करणारी बोधी साहित्यिक कलावंताची तिसरी पिढी. अशी साहित्याची वर्गवारी करता येईल. मनोरंजनाबरोबरच रसिक प्रेक्षकांना ज्ञानी बनविण्याचे काम 'बोधी रंगभूमी' करण्याचा प्रयत्न करताना दिसते. 'बोधी' म्हणजे ज्ञान, 'बोधी साहित्य' म्हणजे ज्ञानसाहित्य बोधी रंगभूमी ही ज्ञानशरण रंगभूमी आहे. ती विज्ञाननिष्ठ आहे. अशी मांडणी बोधी संस्कृती निर्मात्यांनी म्हटले आहे. 'बोधी' शी संबंधीत कलाकारांनी दलित ही संज्ञा कालबाह्य ठरवून दलितत्व ही एक अवस्था होती. ज्या अवस्थेतून आपण बाहेर पडलेलो आहोत. आपले साहित्यही बाहेर पडलेले आहे. अशी भूमिका घेवून 'बोधी' ही सर्वकष संज्ञा आपल्या साहित्याला वापरण्याचा आग्रह धरलेला आहे.

थोडक्यात,आज दलित साहित्याची चळवळ थोडी मंदावल्यासारखी दिसते. हे खरे आहे. याचे कारण उघड आहे. दलितांच्या साहित्यिक सांस्कृतिक चळवळीशी ज्या राजकीय चळवळी अनुबंदीत होत्या त्या चळवळींचेच तीन तेरा वाजलेले असल्यामुळे दलित साहित्य आणि सांस्कृतिक चळवळीला मंदावलेपण प्राप्त झालेले आहे.

आलिकडच्या काळात दलित चळवळीने 'दलित' हा शब्द टाकून बांधिलकी सूचक पण विशिष्ट वैचारिक अधिष्ठान असलेला 'बोधी' हा शब्द स्वीकारलेला आहे. त्या दृष्टीने 'अखिल भारतीय बोधी नाट्य परिषद' नवे प्रयत्न करीत आहे. या वरुन असे म्हणता येईल की, दलित रंगभूमीचा पर्यायाने साहित्याचा पुढील टप्पा म्हणून ह्या बोधी 'रंगभूमीकडे' पाहता येईल.

आज देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे उलटून गेली, परंतु स्वातंत्र्य पूर्व काळामध्ये ज्या सामाजिक समस्या दलितांना भेडसावत होत्या त्यातून आजही त्यांची सुटका झाली नाही. अशा मानवनिर्मित समस्यांचे दिग्दर्शन करुन समाजमन परिवर्तनाभिमुख तयार करणे हे दलित साहित्याचे पर्यायाने बोधी साहित्याचे वैशिष्ट्य मानावे लागेल.

**निष्कर्ष :-**

१) दलित साहित्य हे एका सुनिश्चित प्रेरणेचे, व्यापक सामाजिक जाणिवेचे, दलित दृष्टिकोण घेऊन व सामाजिक बांधिलकीच्या परिबंधात राहून विकसित होत जाणारे साहित्य आहे.

२) प्रस्थापित साहित्यात न आलेली 'दलित जाणीव' दलित जीवनातून होणारी अनुभवाभिव्यक्तीमधून प्रकट होते. त्यामुळे दलित-दर्शनाचा 'दलित' दृष्टीकोण हजर नसेल, तर ते दलित साहित्य होत नसते.

३) दलित साहित्य हे 'दलित' जीवनविषयक नव्या जाणिवेचे आकलन देते.

४) आजवर अपेक्षित राहिलेल्या 'दलित' जीवनाचा दलित साहित्य पहिल्यांदा विचार करते.

५) दलित साहित्य हे परिवर्तनकारी व क्रांती सन्मुख असलेले साहित्य आहे.

६) समाज प्रबोधनाचे, समाज जागृतीचे कार्य घडवून आणण्यात प्रचारात्मकतेचा दोष पत्करुनही दलित साहित्य हे आज अग्रेसर राहिले आहे.

७) सन १९६० च्या दशकात दलित साहित्य लिहिणारी पहिली पिढी आणि १९८० च्या दशकातील आंबेडकरवादी दुसरी पिढी तर २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर लेखन करणारी बोधी साहित्यिक कलावंताची आजची तिसरी पिढी याचा विचार करता दलित साहित्याचा होणारा हा बदलता प्रवास सकारात्मक म्हणावा लागेल.

**संदर्भ :-**

१) डॉ. कृष्णा किरवले दलित चळवळ आणि साहित्य.

२) शरद पाटील - समाज प्रबोधन पत्रिका

३) राजा ढाले - नाकेबंदी - प्रस्तावना

४) बाबूराव बागूल - युगांतर दलित साहित्य विशेषांक - १९७८

५) डॉ. योगेंद्र मेश्राम दलित साहित्य उद्गम आणि विकास

६) प्रभाकर मांडे - दलित साहित्याचे निराळेपण

७) डॉ. वसंत डोळस दलित साहित्य प्रेरणा आणि स्वरुप.